# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १५२–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. बापू नाना मांग,<br>मु. पो. हळ्ळी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बापू नाना मांग, मु.पो. हळ्ळी, ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी अर्ज देवून प्रोसेसिंग फी रु.५०/– पावती क्रमांक ५३४००६१ दि. ६.३.२०१० रोजी भरलेले आहेत. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार वितरण मेन्सचा विस्तार असलेने एक महिन्यात चलन न मिळालेमुळे प्रस्तुतची तक्रार दि. १६.७.२०१० रोजी मंचाकडे दाखल केली आहे. यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. २५६ दि. ८.७.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे.

अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ७९४७ दि. १२.७.२०१० नुसार आदेश पारीत करुन कृती मानके साध्य करण्यात अपयश आलेस ग्राहक भरपाई द्यावी असे आदेश दिले. या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतची तक्रार दि. १६.७.२०१० रोजी मंचाकडे दाखल करण्यात आली आहे. तक्रारीमध्ये चलन देण्यात झालेल्या विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. तक्रार प्रतिधीमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि. ६.३.२०१० रोजी प्रोसेसिंग फी भरलेली आहे. त्यांना दि. १४.७.२०१० रोजी चलन देण्यात आलेले आहे. त्यांचे ०.३६ कि.मी. चे लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणी घेतली असतां, तक्रारदार हजर, प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. श्री. खापरे यांनी चलन देण्यास विलंब झालेला आहे त्यामुळे भरपाई मिळावी अशी मागणी केली. वि.प.तर्फे तक्रारदारास चलन दिल्यानंतर ती रक्कम दि. ४.८.२०१० रोजी भरली आहे असे सांगण्यात आले. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे भरपाई मिळणेस ते हक्कदार आहेत काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे.

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंचे लेखी / तोंडी कथनानुसार तक्रारदार यांनी दि. ६.३.२०१० रोजी प्रोसेसिंग फी भरुन अर्ज दिला असल्याचे मान्य केले. तक्रारदारास वितरण मेन्सचा विस्तार असलेने १ महिन्यात चलन देणे नियमानुसार जरुरी होते, ते दिले गेले नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. अंतर्गत कक्षाने चलन देण्याविषयी निश्चित मत न नोंदविता कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे भरपाई देण्याबाबत मोघम स्वरुपात आदेश दिले आहेत. वि.प.चे लेखी अहवाल पहाता, लघुदाब वाहिनी ०.३६ चे काम आहे. दि. १४.७.२०१० ला चलन दिले आहे, परंतु विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. त्यामुळे दि. ५.४.२०१० ते १४.७.२०१० या कालावधीतील १३ आठवड्यांच्या विलंब झाला आहे हे स्पष्ट होते. कृती मानके विनियम २००५ मधील तरतुदी व परिशिष्ट अ नुसार प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे १३ आठवड्यांचा विलंबापोटी रु. १३००/– वि.प.ने ग्राहकास द्यावेत. खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीचा कवठे महांकाळ विभाग / संख उप विभाग यांनी तक्रारदार यांस कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयश आल्याने दि. ५.४.२०१० ते १४.७.२०१० या कालावधीतील १३ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे रु.१३००/– ग्राहकास द्यावेत.

३) सदरची रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजित करण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष